**२०. आयुक्तास, सरकारी वर्षात आकारणी पुस्तकात सुधारणा करता येतील.–**

(१) पोट-नियम (२) मधील तरतुदींच्या अधीन राहून, आयुक्तास, कोणत्याही संबंधित व्यक्तीने अभिवेदन केल्यावर किंवा आकारणी पुस्तक ज्या सरकारी वर्षाशी संबंधित व्यक्तीने अभिवेदन केल्यावर किंवा आकारणी पुस्तक ज्या सरकारी वर्षात कोणत्याही वेळी अन्य कोणतीही माहिती मिळाल्यावर त्या आकारणी पुस्तकात-

(अ) ज्या कोणत्याही व्यक्तीने नाव अशा रीतीने दाखल करणे आवश्यक असेल अशा व्यक्तीचे नाव त्यात दाखल करून किंवा पूर्वी वगळण्यात आलेल्या कोणत्याही जागा त्यात दाखल करून;[1]

---

१. सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम ३१ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(ब) मालमत्ता कर देण्यास जबाबदार नसलेल्या कोणत्याही व्यक्तीचे नाव काढून टाकून;

(क) कोणत्याही करयोग्य मूल्याची [१][किंवा, यथास्थिती, भांडवली मूल्याची] आणि त्यावर आधारलेल्या आकारणीची रक्कम वाढवून किंवा कमी करून;

(ड) ज्या कोणत्याही जमिनीचे किंवा इमारतीचे मूल्य चुकीचे ठरवण्यात आले असेल किंवा जिची आकारणी लबाडीने, अभावितपणे किंवा चुकीने करण्यात आली असेल त्या जमिनीवरील किंवा इमारतीवरील आकारणीत फेरफार करून;

(ई) आकारणी पुस्तक तयार करण्यात आल्यानंतर पूर्णतः किंवा अंशतः उभारण्यात आलेल्या, पुन्हा उभारण्यात आलेल्या, फेरफार करण्यात आलेल्या, वाढवण्यात आलेल्या किंवा पुन्हा बांधण्यात आलेल्या कोणत्याही इमारतीसंबंधी नोंद दाखल करून किंवा अशा नोंदीत फेरफार करून;

(फ) कोणताही मालमत्ता कर देण्याच्या दायित्वातून कोणत्याही जागेस सूट देणारी कोणतीही नोंद दाखल करून किंवा रद्द करून;

सुधारणा करता येईल.

(२) ज्या सुधारणेमुळे कोणत्याही व्यक्तीवर मालमत्ता कर देण्याची अशी कोणतीही जबाबदारी लादण्यात येत असेल की, जी अशा सुधारणेच्या अभावी तिच्यावर लादली गेली नसतील किंवा ज्या सुधारणेमुळे आकारणी पुस्तकात नमूद केल्याप्रमाणे कोणत्याही जागेच्या करयोग्य मूल्यात [२][किंवा, यथास्थिती, भांडवली मूल्यात] वाढ होत असेल, अशी कोणतीही सुधारणा पोट-नियम (१) अन्वये करण्यात आली असेल तेव्हा, आयुक्ताने, नियम १५, पोट-नियम (२) मध्ये तरतूद करण्यात आल्याप्रमाणे विशेष लेखी नोटीस दिली पाहिजे आणि शक्य असेल तेथवर, नियम १६, १७ आणि १८ मध्ये घालून दिलेली कार्यपद्धती अनुसरण्यात आली पाहिजे.

(३) फेरफार केलेल्या नोंदीनुसार संबंधित व्यक्तीची असलेली जबाबदारी किंवा तिला मिळणारी सूट ठरवण्याच्या प्रयोजनासाठी अशी प्रत्येक सुधारणा, ही सुधारणेचे समर्थन करणारी परिस्थिती अस्तित्वात असेल तेव्हा, चालू सरकारी वर्षातील सर्वात अगोदरच्या दिवसापासून करण्यात आली आहे, असे मानले जाईल.